महाराष्ट्र शासन
इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
शासन निर्णय क्रमांक: POLICY-2026/C.R.64/IT (E-1604501)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ मे, २०२६

प्रस्तावना:

कृत्रिम बुद्धिमत्ता ही जागतिक स्तरावर अर्थव्यवस्था, उद्योग आणि प्रशासन व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. भारतामध्ये "National Strategy for AI", "IndiaAI Mission", AI पोर्टल्स, उत्कृष्टता केंद्रे (CoE) आणि सार्वजनिक व खासगी गुंतवणूक यांच्या माध्यमातून AI क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य असून वित्त, उद्योग व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे आर्थिक विकास, प्रशासनातील सुधारणा व नागरिकाभिमुख सेवा वितरणासाठी AI चा उपयोग करण्यासाठी राज्य सक्षम आहे.

राज्यात आधीपासून नवोन्मेष क्षेत्रे, स्टार्टअप्सना चालना देणे, AI पायाभूत सुविधा व क्षेत्रनिहाय AI चा वापर यासंदर्भात विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. तथापि, AI चा व्यापक अवलंब, गुंतवणूक आकर्षित करणे, स्थानिक क्षमता विकसित करणे व AI चा नैतिक व जबाबदार वापर सुनिश्चित करण्यासाठी संरचित धोरणाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने "महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण-२०२६" तयार करून त्यास मा. मंत्रिमंडळाच्या दि. २९ एप्रिल, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. सदर मान्यतेस अनुसरून "महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण-२०२६" प्रसिद्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मा. मंत्रिमंडळाच्या दि. २९ एप्रिल, २०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेस अनुलक्षून मराठी व इंग्रजी भाषेतील महाराष्ट्र राज्यासाठीचे "महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण-२०२६" सदर शासन निर्णयाच्या **परिशिष्ट-अ** आणि **परिशिष्ट-ब** येथे जोडल्याप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

२. सदर धोरणाचे खालीलप्रमाणे प्रमुख ७ स्तंभ आहेत.

i. राज्यव्यापी AI सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता पायाभूत सुविधांचा विकास,

ii. कृत्रिम बुद्धिमत्ता नवोपक्रम आणि आंतरकार्यक्षमतेसाठी (Interoperability) स्थानिक डेटासेट्स आणि प्लॅटफॉर्म्स निर्मीती,

iii. भविष्योन्मुख मनुष्यबळासाठी स्थानिक कौशल्य विकास व प्रशिक्षण,

iv. सार्वजनिक क्षेत्रातील नवोपक्रमांसाठी "स्टार्टअप-फर्स्ट" चा अवलंब व अर्थसहाय्य,

v. प्रायोगिक प्रकल्पांना उत्पादन स्तरावर नेण्यासाठी (Pilot-to-Scale Deployment) अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगकाची अंमलबजावणी,

vi. अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष संशोधनासाठी उत्कृष्टता केंद्रे (CoEs),

vii. नैतिक कृत्रिम बुद्धिमत्ता (Ethical AI) आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी अनुपालन आराखडा.

३. या धोरणाच्या परिशिष्ट १४ मध्ये कालानुरूप/वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागास असतील.

४. सदर धोरण हे शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.२०२६०५०६१५२२२८७२११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A148OD70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFB80AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.05.06 16:13:26 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
१५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०) सर्व पोलीस आयुक्त,
२१) सर्व विभागीय आयुक्त,
२२) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२५) सर्व जिल्हाधिकारी,
२६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२८) सर्व मंत्रालयीन विभाग,
२९) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३१) निवडनस्ती/मातं.

परिशिष्ट-अ

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय क्र. POLICY-२०२६/प्र. क्र.६४/मातं दि. ०६/०५ /२०२६ सोबतचे परिशिष्ट

महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण २०२६

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान
व कृत्रिम बुद्धिमत्ता (E, IT & AI) विभाग
महाराष्ट्र शासन

अनुक्रमाणिका

१. प्रस्तावना ४

१.१ महाराष्ट्रात कृत्रिम बुद्धिमत्तेतील वाटचाल ४

१.२ महाराष्ट्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरणाची आवश्यकता ६

२. दृष्टी आणि उद्दिष्टे ७

२.१ दृष्टी (Vision) ७

२.२ उद्दिष्टे (Objectives) ७

२.३ धोरणात्मक दृष्टिकोन (Policy Approach) ८

३. लागू क्षेत्र व व्याप्ती ९

४. प्रशासकीय आराखडा १०

५. कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाचे स्तंभ १०

५.१ राज्यव्यापी AI सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता पायाभूत सुविधांचा विकास १०

५.२ कृत्रिम बुद्धिमत्ता नवोपक्रम आणि आंतरकार्यक्षमतेसाठी (Interoperability) स्थानिक डेटासेट्स आणि प्लॅटफॉर्म्स निर्मीती १०

५.३ भविष्योन्मुख मनुष्यबळासाठी स्थानिक कौशल्य विकास व प्रशिक्षण ११

५.४ सार्वजनिक क्षेत्रातील नवोपक्रमांसाठी “स्टार्टअप-फर्स्ट” चा अवलंब व अर्थसहाय्य ११

५.५ प्रायोगिक प्रकल्पांना उत्पादन स्तरावर नेण्यासाठी (Pilot-to-Scale Deployment) अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगकाची अंमलबजावणी ११

५.६ अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष संशोधनासाठी उत्कृष्टता केंद्रे (CoE) ११

५.७ नैतिक कृत्रिम बुद्धिमत्ता (Ethical AI) आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी अनुपालन आराखडा ११

६. राज्यव्यापी AI सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता पायाभूत सुविधांचा विकास १२

६.१ कृत्रिम बुद्धिमत्ता संगणन (Compute) आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास १२

६.२ शासकीय विभागांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठ्या प्रमाणावरील अवलंब करणे १३

७. कृत्रिम बुद्धिमत्ता नवोपक्रम आणि आंतरकार्यक्षमतेसाठी (Interoperability) स्थानिक डेटासेट्स आणि प्लॅटफॉर्म्स निर्मिती १५

७.१ क्षेत्र-विशिष्ट (Domain-specific) डेटासेट्सची निर्मिती आणि संकलन १५

७.२ राज्य कृत्रिम बुद्धिमत्ता डेटा आदान-प्रदान आणि डेटासेट प्लॅटफॉर्म्स १६

८. कुशल व भविष्योन्मुख मनुष्यबळासाठी स्थानिक कौशल्य विकास व प्रशिक्षण १६

८.१ व्यावसायिक प्रशिक्षण व मनुष्यबळ कौशल्य वृद्धी १६

८.२ शासकीय अधिकाऱ्यांसाठी क्षमता बांधणी (Capacity Building) १८

९. सार्वजनिक क्षेत्रातील नवोपक्रमांसाठी स्टार्टअप-फर्स्टचा अवलंब व अर्थसहाय्य १९

९.१ MSME साठी कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब सहाय्य १९

९.२ स्टार्टअप अर्थसहाय्य आणि नवोपक्रम सहाय्य २०

१०. प्रायोगिक तत्त्वापासून व्यापक प्रमाणावरील अंमलबजावणीपर्यंत (Pilot-to-Scale Deployment) अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगकाची अंमलबजावणी २१

१०.१ कृत्रिम बुद्धिमत्ता इनक्युबेशन (Incubation) आणि प्रवेगक (Acceleration) पायाभूत सुविधा २१

१०.२ स्टार्टअप पायलट, अनुदान आणि सर्वसमावेशक सहाय्य यंत्रणा २२

११. अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष संशोधनासाठी उत्कृष्टता केंद्रे २३

११.१. क्षेत्र-विशिष्ट उत्कृष्टता केंद्रांची स्थापना २३

११.२ संशोधन व विकास (R&D) सहाय्य आणि बौद्धिक संपदा निर्मिती २३

१२. नैतिक कृत्रिम बुद्धिमत्ता (Ethical AI) आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी अनुपालन आराखडा २४

१३. कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब आणि नवोपक्रमांना चालना देण्यासाठी प्रोत्साहने (Incentives) २५

१४. परिशिष्ट २७

१४.१ परताव्यास पात्र प्रमाणनांची यादी २७

उपरोक्त यादीमध्ये कोणतीही भर किंवा बदल (Additions or modifications) केवळ या धोरणाच्या प्रशासकीय चौकट (Governance Framework) या भागांतर्गत प्रस्तावित विभाग स्तरीय समितीच्या (Department Level Committee) मान्यतेनेच करण्यात येतील. २९

१४.२ संज्ञा व अर्थ २९

१. प्रस्तावना

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence (AI)) वेगाने विकसित होत असून, उद्योग, अर्थव्यवस्था तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रशासनाच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल घडवत आहे. प्रमुख क्षेत्रांमधील वाढत्या प्रमाणात होणारा वापर, शासनाचा भक्कम पाठिंबा तसेच उद्योगातील वापराच्या उदाहरणांचा विस्तार यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार होत आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत असून, ती एक महत्त्वाचा घटक बनत आहे. जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा आर्थिक परिणाम लक्षणीय असून, २०३० पर्यंत जागतिक अर्थव्यवस्थेत सुमारे १५.७ ट्रिलियन अमेरिकन डॉलर इतके योगदान होण्याचा अंदाज आहे[१].

जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारताची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे. २०२७ पर्यंत भारतीय कृत्रिम बुद्धिमत्ता बाजारपेठ सुमारे १७ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे[२]. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संधीची दखल घेऊन केंद्र शासनाने अनेक उपक्रम राबविले आहेत. नीती आयोगाद्वारे २०१८ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणानुसार (National Strategy for Artificial Intelligence (NSAI)) प्रमुख क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता आणि नवोन्मेष प्रोत्साहित करण्यासाठी २०२० मध्ये "IndiaAI" हे राष्ट्रीय पोर्टल सुरू करण्यात आले असून, ते कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधित घडामोडींसाठी केंद्रीकृत व्यासपीठ म्हणून कार्य करते. याशिवाय, देशात विविध कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्रांची (CoE) स्थापना करण्यात आली आहे. २०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये शिक्षण क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी नवीन उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली असून, त्यासाठी ₹५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. "AI for India २०३०" या उपक्रमाद्वारे विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब कार्यान्वित करणे आणि सर्वसमावेशक नवोन्मेषाला चालना देणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच, २०२३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या IndiaAI मिशनद्वारे व्यापक कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्था निर्माण करून भारताला जागतिक स्तरावर एक प्रमुख स्थान प्राप्त करून देण्याचा उद्देश आहे

१.१ महाराष्ट्रात कृत्रिम बुद्धिमत्तेतील वाटचाल

महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठी राज्य अर्थव्यवस्था असून, राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये (GDP) राज्याचा वाटा अंदाजे १४ टक्के आहे[३]. हे राज्य एक प्रमुख आर्थिक व तांत्रिक केंद्र असून, मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हणून मान्यता प्राप्त आहे. राज्याच्या तांत्रिक प्रगतीस चालना देण्यासाठी नवी मुंबई येथे

1.https://indiaai.gov.in/news/ai-has-the-potential-to-contribute-१५-७-trillion-to-the-global-economy-by-२०३०-cag-girish-chandra-murmu

2.https://indiaai.gov.in/news/nasscom-bcg-report-says-india-s-ai-market-is-expected-to-touch-१७-billion-usd-by-२०२७

3.https://midcindia.org

सुमारे ३०० एकर क्षेत्रावर "इनोव्हेशन सिटी (Innovation City)" विकसित करण्यात येत आहे, जी अत्याधुनिक संशोधन व कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी प्रमुख केंद्र म्हणून कार्य करेल.

याव्यतिरिक्त, महाराष्ट्र शासन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence (CoE)) कार्यक्रम विकसित करत असून, क्षेत्रनिहाय कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नवोन्मेषाला चालना देणारी सुसज्ज केंद्रे स्थापन करण्यासाठी धोरणात्मक आराखडा तयार करण्यात येत आहे. राज्य शासन "एम-हब (M-Hub)" या कृत्रिम बुद्धिमत्ता-केंद्रित नवउद्योजक त्वरक यंत्रणेच्या स्थापनेसाठीही कार्यरत आहे[४]. डिजिटल पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग म्हणून, जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांसोबत सहकार्य वाढविणे तसेच शिक्षणसंस्था, नवउद्योजक आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय दृढ करण्याच्या उद्देशाने मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या प्रमुख शहरांमध्ये ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) पार्क्स स्थापन करण्यात येत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता व शाश्वत उद्योगांमधील गुंतवणुकीस चालना देण्यासाठी जानेवारी २०२६ मध्ये दावोस येथे आयोजित जागतिक आर्थिक मंचादरम्यान (WEF), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) सुमारे २६ अब्ज अमेरिकन डॉलर किमतीच्या सामंजस्य करारांवर (MoUs) औपचारिक स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

प्रशासन आणि औद्योगीक कार्यक्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करत आहे[५]. यामध्ये ग्रामीण आरोग्य सेवेसाठी "आंतरराष्ट्रीय परिवर्तनशील कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र (International Centre for Transformational AI (ICTAI))", शेतकऱ्यांसाठी २,०६० कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम हवामान केंद्रे उभारणारा "महावेध" प्रकल्प, कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करणारे "चौथ्या औद्योगिक क्रांतीचे केंद्र (Centre for the Fourth Industrial Revolution (C४IR))" यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. याशिवाय, खाजगी क्षेत्राच्या भागीदारीतून आरोग्य, कृषी आणि इतर क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबविले जात आहेत. याव्यतिरिक्त, वाहतूक सुरक्षेसाठी महाराष्ट्र शासन पुणे द्रुतगती मार्गावर नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता सक्षम बुद्धिमान वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (AI-powered Intelligent Traffic Management System (ITMS)) लागू करत आहे. या प्रणालीमध्ये २०० हून अधिक कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या सहाय्याने १७ विविध प्रकारच्या वाहतूक नियमभंगांची नोंद घेण्यात येते आणि स्वयंचलितपणे ई-चलन जारी केले जाते. जागतिक स्तरावरील कंपन्यांकडून महाराष्ट्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमतेची दखल घेतली जात असून, त्यामुळे राज्याच्या डिजिटल परिसंस्थेमध्ये लक्षणीय गुंतवणूक होत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता प्रभावीपणे उपयोगात आणण्यासाठी भक्कम

4.https://www.business-standard.com/technology/tech-news/maharashtra-bets-on-ai-with-m-hub-innovation-centre-in-navi-mumbai-१२५०२२८०१०१५__१.html

5.https://indiaai.gov.in/article/how-maharashtra-is-leveraging-ai-based-solutions-five-use-cases

पायाभूत व्यवस्था निर्माण करत असून, आर्थिक विकासास चालना देत आहे, सार्वजनिक सेवांचा दर्जा उंचावत आहे आणि तांत्रिक नवोन्मेष क्षेत्रात आघाडीचे स्थान प्राप्त करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

१.२ महाराष्ट्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरणाची आवश्यकता

गुंतवणुकीला चालना देणे, सक्षम परिसंस्था निर्माण करणे आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवलंब व अंमलबजावणीस मार्गदर्शन करणारे सुस्पष्ट धोरण असणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्राने वित्त, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये आपले स्थान प्रस्थापित केले असून, तांत्रिक विकासासाठी भक्कम पाया उभारला आहे. तथापि, या प्रगतीला अधिक गती देण्यासाठी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित अर्थव्यवस्था म्हणून राज्याचे स्थान अधिक बळकट करण्यासाठी, विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची पूर्ण क्षमता प्रभावीपणे उपयोगात आणण्यासाठी संरचित धोरणाची आवश्यकता आहे. सुस्पष्ट कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाद्वारे उद्योग, नवउद्योजक आणि संशोधन संस्था यांना स्पष्ट दिशा व मार्गदर्शक आराखडा उपलब्ध होतो, ज्यामुळे त्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित उपाययोजनांची निर्मिती व विस्तार प्रभावीपणे करता येतो.

ज्या देशांनी आणि राज्यांनी सक्रियपणे कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांची रचना केली आहे, ते गुंतवणूक आकर्षित करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधनाला चालना देणे आणि कुशल मनुष्यबळ निर्माण करणे यासाठी अधिक सक्षम ठरतात, ज्यामुळे त्यांना जागतिक स्तरावरील स्पर्धेत तुलनात्मक लाभ प्राप्त होतो. याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने गुंतवणूक वाढविणे, विविध उद्योगांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब सक्षम करणे आणि नवोन्मेषासाठी पोषक वातावरण निर्माण करणे या उद्देशाने आपले पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्राच्या वित्त, उत्पादन, माहिती तंत्रज्ञान आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील सामर्थ्यांशी सुसंगत असा धोरणात्मक कृत्रिम बुद्धिमत्ता आराखडा तयार करण्यासाठी राज्य शासनाने उद्योग, शिक्षणसंस्था आणि प्रशासन क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेली १६ सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

२. दृष्टी आणि उद्दिष्टे

२.१ दृष्टी (Vision)

- महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित सर्वसमावेशक, नैतिक आणि उत्तरदायी विकासासाठी अग्रगण्य केंद्र म्हणून स्थापित करणे.
- सुरक्षित व विश्वासार्ह कृत्रिम बुद्धिमत्ता वापरास सक्षम करणारी, प्रगत संशोधनाला चालना देणारी आणि जागतिक गुंतवणूक आकर्षित करणारी गतिशील कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्था निर्माण करणे.
- सर्वसमावेशकता, आर्थिक विकास, नागरिक सक्षमीकरण आणि डिजिटल प्रशासन सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उत्प्रेरक म्हणून प्रभावी वापर करणे.

२.२ उद्दिष्टे (Objectives)

महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाचा उद्देश राज्याला राष्ट्रीय व जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेत अग्रस्थानावर स्थापित करणे हा असून, त्यासाठी संशोधन, विकास आणि अंमलबजावणीस पोषक वातावरण निर्माण करण्यात येईल. या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- सन २०३०-३१ पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात रु. १०,००० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व AI-सक्षम क्षेत्रांमध्ये १.५ लाखांहून अधिक थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा, क्लाउड व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये २ लाख युवक व व्यावसायिकांना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे.
- महाराष्ट्रातील प्रत्येक प्रशासकीय विभागात किमान एक कृत्रिम बुद्धिमत्ता वापर प्रकरण (AI use case) अंमलात आणणे किंवा राज्यस्तरावर एकत्रितपणे किमान ५० AI वापर प्रकरणे विकसित करणे.
- महाराष्ट्रातील प्रत्येक प्रशासकीय विभागात एक याप्रमाणे एकूण सहा कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्रे (AI Centres of Excellence -CoEs) स्थापन करणे.
- प्रोटोटाइप्स, पायलट प्रकल्प तसेच नवोन्मेषांना चालना देण्यासाठी "महाराष्ट्र अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगक" (Maharashtra Applied AI Accelerator) स्थापन करणे.
- किमान २,००० GPUs उपलब्ध करून देणे, त्यापैकी किमान १,००० GPUs एका AI क्षेत्रात आणि उर्वरित राज्यातील इतर AI क्षेत्रांमध्ये उपलब्ध करून देणे.
- ५ नवोन्मेष क्षेत्रांमध्ये (Innovation Regions) कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष शहरे (AI Innovation Cities) स्थापन करणे.

- ५००० MSME क्षेत्रातील घटकांना AI चा अंगीकरणासाठी आर्थिक सहाय्य करणे.
- महाराष्ट्रात किमान एक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिकॉर्नच्या निर्मितीस पाठबळ देणे.

राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विकास, अंगीकार, नवोन्मेष तसेच जबाबदार प्रशासन राबविण्यासाठी या उद्देशाने, IndiaAI Mission च्या धर्तीवर "महाराष्ट्र AI मिशन" स्थापन करण्यात येईल.

"महाराष्ट्र AI मिशन" हे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (E, IT & AI) विभागाच्या अधिपत्याखाली कार्य करेल.

२.३ धोरणात्मक दृष्टिकोन (Policy Approach)

- कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष क्षेत्रांमध्ये लक्ष केंद्रित हस्तक्षेपांद्वारे राज्यात सशक्त कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्था निर्माण करणे.
- शासकीय विभागांमध्ये टप्प्याटप्प्याने व कालबद्ध पद्धतीने कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब सुनिश्चित करणे.
- डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा (DPI) कृत्रिम बुद्धिमत्ता स्तरांसह व्यापक वापर करून एकात्मिक प्रणाली विकसित करणे.
- एजेंटिक कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित उपाययोजनांच्या विकास व वापरास प्राधान्य देणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील, प्रधान्याने स्थानिक स्टार्टअप्सना प्रोत्साहन व मार्गदर्शन देणे,
- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) नैतिक व सर्वसमावेशक वापरास प्राधान्य देणे.

३. लागू क्षेत्र व व्याप्ती

सदर धोरण शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल आणि नवीन धोरण जाहीर होईपर्यंत किंवा किमान ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत लागू राहील.

४. प्रशासकीय आराखडा

महाराष्ट्र शासनाचा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (E, IT & AI) हा या धोरणाच्या प्रशासन, अंमलबजावणी आणि एकूण देखरेखीची जबाबदारी असलेला नोडल विभाग राहील. धोरणाच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबी, ज्यामध्ये मंजुरी, संबंधित प्रशासकीय विभागांशी समन्वय तसेच परिसंस्थेतील भागीदारांशी सहभाग यांचा समावेश आहे, त्या सर्व इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (E, IT & AI) विभागामार्फत पार पाडण्यात येतील. धोरणाचे प्रमुख स्तंभ कार्यान्वित करण्यासाठी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उपक्रमांना राज्याच्या प्राधान्यक्रमांशी सुसंगत ठेवण्यासाठी विभाग प्रभावी आंतर-विभागीय समन्वय सुनिश्चित करेल. या धोरण आराखड्याच्या समग्र अंमलबजावणीसाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, आणि मा. मुख्य सचिव या स्तरांवर त्रिस्तरीय समिती संरचना स्थापन केली जाईल.

५. कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाचे स्तंभ

महाराष्ट्राचे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण सात प्रमुख स्तंभांवर आधारित आहे, जे राज्यात AI चा विकास, अवलंब आणि प्रशासनासाठी (governance) एक केंद्रित आराखडा (focused framework) प्रदान करतात. हे स्तंभ 'इंडियाएआय मिशन'शी (IndiaAI Mission) सुसंगत आहेत आणि मूलभूत क्षमता निर्माण करणे, नवोपक्रमांना (innovation) चालना देणे व AI तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर सुनिश्चित करणे, याविषयीचा राज्याचा दृष्टिकोन प्रतिबिंबित करतात. हे स्तंभ प्रशासन आणि उद्योग क्षेत्रात AI च्या व्यापक अवलंबाला (scalable AI adoption) सक्षम करण्याचा प्रयत्न करतात.

प्रत्येक स्तंभ विविध विभाग आणि क्षेत्रांमधील AI उपक्रमांची रचना आणि अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी विशिष्ट हस्तक्षेप क्षेत्रे (specific intervention areas) निश्चित करतो. धोरणाचे सात स्तंभ खालीलप्रमाणे आहेत:

५.१ राज्यव्यापी AI सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता पायाभूत सुविधांचा विकास

- कृत्रिम बुद्धिमत्ता संगणन (compute) आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास
- शासनाच्या सर्व विभागांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठ्या प्रमाणावरील अवलंब

५.२ कृत्रिम बुद्धिमत्ता नवोपक्रम आणि आंतरकार्यक्षमतेसाठी (Interoperability) स्थानिक डेटासेट्स आणि प्लॅटफॉर्म्स निर्मीती

- क्षेत्रनिहाय (domain-specific) डेटासेट्सची निर्मिती आणि संकलन

- राज्य कृत्रिम बुद्धिमत्ता डेटा एक्सचेंज व डेटासेट प्लॅटफॉर्म

५.३ भविष्योन्मुख मनुष्यबळासाठी स्थानिक कौशल्य विकास व प्रशिक्षण

- व्यावसायिक प्रशिक्षण व मनुष्यबळ कौशल्य वृद्धी
- शासकीय अधिकाऱ्यांसाठी क्षमता वृद्धी (Capacity Building)

५.४ सार्वजनिक क्षेत्रातील नवोपक्रमांसाठी "स्टार्टअप-फर्स्ट" चा अवलंब व अर्थसहाय्य

- MSME साठी कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब सहाय्य
- स्टार्टअप वित्तपुरवठा व नवोन्मेष सहाय्य

५.५ प्रायोगिक प्रकल्पांना उत्पादन स्तरावर नेण्यासाठी (Pilot-to-Scale Deployment) अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगकाची अंमलबजावणी

- कृत्रिम बुद्धिमत्ता इन्क्युबेशन व प्रवेगक पायाभूत सुविधा
- स्टार्टअप प्रायोगिक प्रकल्प व सहाय्य

५.६ अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष संशोधनासाठी उत्कृष्टता केंद्रे (CoE)

- क्षेत्र-विशिष्ट कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्रांची स्थापना व कार्यक्षेत्र
- संशोधन व विकास सहाय्य आणि पेटंट अर्ज खर्च परतावा (Patent Filing Cost)

५.७ नैतिक कृत्रिम बुद्धिमत्ता (Ethical AI) आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी अनुपालन आराखडा

६. राज्यव्यापी AI सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता पायाभूत सुविधांचा विकास

उच्च-कार्यक्षमता आणि विस्तारक्षम (scalable) संगणन पायाभूत सुविधा (computing infrastructure) ही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) उपाययोजनांचा विकास, प्रशिक्षण आणि अंमलबजावणीसाठी एक मूलभूत गरज आहे. प्रशासन, संशोधन आणि उद्योग क्षेत्रात AI चा अवलंब जस-जसे वाढत आहे, तस-तसे नवोन्मेषाला (innovation) आणि मोठ्या प्रमाणावरील अंमलबजावणीला पाठबळ देण्यासाठी परवडणाऱ्या आणि खात्रीशीर संगणन क्षमतेची (compute capacity) उपलब्धता अत्यावश्यक बनते. त्यानुसार, संसाधनांचा प्रभावी वापर आणि राष्ट्रीय उपक्रमांशी सुसंगतता सुनिश्चित करतानाच, राज्यव्यापी AI अवलंबाला सक्षम करण्यासाठी सामायिक व विस्तारक्षम AI संगणन पायाभूत सुविधा निर्माण करण्याला महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणात प्राधान्य देण्यात आले आहे.

६.१ कृत्रिम बुद्धिमत्ता संगणन (Compute) आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास

प्रगत AI कार्यव्यापाला (AI workload) पाठबळ देण्यासाठी महाराष्ट्र शासन राज्यामध्ये 'AI-सज्ज' (AI-ready) संगणन पायाभूत सुविधा स्थापन करेल.

- केंद्र शासनाच्या संगणन संसाधनांचा उपयोग करून कार्यक्षमता व खर्च यांचे सर्वोत्तमीकरण साध्य करण्याच्या दृष्टीने, राज्य शासनाकडून पुरेशा डेटा पुनर्प्राप्ती यंत्रणांसह किमान २,००० GPUs उपलब्ध करून देण्यात येतील. यापैकी किमान १,००० GPUs हे राज्यातील एका AI क्षेत्रात उपलब्ध करून देण्यात येतील.
    - AI पायाभूत सुविधांचा विकास आणि विस्तारीकरणासाठी (scale up) ऊर्जा, पाणी आणि संबंधित पायाभूत सुविधांसाठी जबाबदार असलेल्या प्रशासकीय विभाग आणि संस्थांशी समन्वय साधण्याची आवश्यकता असू शकते. आवश्यकतेनुसार, व्यापक पायाभूत सुविधा नियोजन आराखड्यांशी सुसंगतता (alignment) साधली जाईल.
- संवेदनशील क्षेत्रांतील वापर प्रकरणांसाठी (use cases) राज्य शासन एकूण GPUs क्षमतेपैकी ५% क्षमता उपलब्ध करून देण्याचा विचार करू शकेल.
- भांडवली खर्चाचे सर्वोत्तमीकरण करण्यासाठी आणि वापराची कार्यक्षमता सुधारण्यासाठी, या पायाभूत सुविधांना केंद्र शासनाच्या संगणन संसाधनांच्या उपलब्धतेची जोड दिली जाईल.
- राज्य शासन ऑन-प्रिमाइसेस (on-premise), क्लाउड-आधारित (cloud-based) आणि हायब्रिड (hybrid) आर्किटेक्चर्सचा एकत्रित वापर करून लवचिक आणि संमिश्र अंमलबजावणी रणनिती (hybrid deployment strategy) स्वीकारेल.

- कृत्रिम बुद्धिमत्ता संगणन संसाधने सर्वांसाठी समानरित्या व सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, राज्य शासनाकडून राज्य-समर्थित डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (Digital Public Infrastructure-DPI) म्हणून "कम्प्युट ॲज अ सर्व्हिस" (CaaS) व्यासपीठ विकसित करण्यात येईल. सदर व्यासपीठाद्वारे शासकीय विभाग, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था तसेच इतर प्राधिकृत वापरकर्त्यांना GPUs व संबंधित AI साधनांसह संगणन संसाधनांचा मागणीनुसार, सुरक्षित व सुलभ वापर उपलब्ध करून देण्यात येईल.
- CaaS आराखड्यांतर्गत, समान आणि परवडणारी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासन 'स्तरीकृत प्रवेश आणि मूल्यनिर्धारण मॉडेल' (tiered access and pricing model) लागू करेल. अत्यंत महत्त्वाच्या (mission-critical) उपयोजनांसाठी शासकीय विभागांना आणि सार्वजनिक संस्थांना प्राधान्याने प्रवेश दिला जाईल; तर स्टार्टअप्स, MSMEs आणि नवोदित नवोन्मेषकांना (early-stage innovators) पूर्वनिर्धारित पात्रता निकषांवर आधारित अनुदानित किंवा सवलतीच्या दरात (subsidised or concessional access) उपलब्ध करून दिला जाईल.
- राज्य शासन सहकार्यात्मक व सामायिक वापर व्यवस्थांद्वारे विद्यमान-GPU व CPU पायाभूत सुविधांचा उपयोग अधिक कार्यक्षम करण्यासाठी प्रयत्न करेल.

६.२ शासकीय विभागांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठ्या प्रमाणावरील अवलंब करणे

- सेवा वितरण (service delivery) सुधारण्यासाठी आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढवण्यासाठी राज्य शासन सर्व शासकीय विभागांमध्ये AI च्या पद्धतशीर अवलंबाला चालना देईल. प्रत्येक विभागाला किमान एक उच्च-प्रभावी (high-impact) AI वापर प्रकरण (use case) निश्चित करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक राहिल; किंवा राज्यात राबविल्या जाणाऱ्या AI वापर प्रकरणांमध्ये (use cases) योगदान देणे अनिवार्य असेल.
- विभागांना नागरिक सेवा वितरण, तक्रार निवारण, निरीक्षणे व अनुपालन (inspections and compliance), निर्णय सहाय्य (decision support), पूर्वानुमान व नियोजन (forecasting and planning), रेकॉर्ड व्यवस्थापन (records management) आणि कार्यप्रवाह स्वयंचलन (workflow automation) यांसारख्या कार्यांमध्ये AI उपाययोजनांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित केले जाईल. ही वापर प्रकरणे (use cases) मानवी निर्णयप्रक्रियेला पर्याय न बनता तिला अधिक सक्षम (augment) करण्यासाठी तयार केली जातील.
- बहु-स्तरीय (multi-step), नियमांवर आधारित (rule-based) आणि मोठ्या प्रमाणावरील (high-volume) शासनाच्या कार्यप्रवाहांचे (workflows) स्वयंचलन करण्यासाठी 'एजंटिक AI प्रणालींचा' (Agentic AI systems) निवडक पातळीवर पायलट प्रकल्प राबविण्यात येईल. अशा सर्व प्रणाली कार्यान्वित करताना स्पष्ट मानवसमाविष्ट--पर्यवेक्षण' (human-in-the-loop oversight), एक

निश्चित उन्नयन यंत्रणा (escalation mechanism) आणि स्पष्टीकरणात्मक आवश्यकतांच्या (explainability requirements) अधीन राहूनच त्यांची अंमलबजावणी केली जाईल.

- राज्य शासन टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीचा दृष्टिकोन (phased implementation approach) स्वीकारेल; ज्याची सुरुवात प्रायोगिक प्रकल्प (pilots) आणि 'प्रूफ-ऑफ-कन्सेप्ट्स'ने (proof-of-concepts) होईल व त्यानंतर सिद्ध झालेल्या परिणामांवर (demonstrated outcomes) आधारित त्यांचा व्यापक स्तरावर विस्तार (scaled rollouts) केला जाईल.

७. कृत्रिम बुद्धिमत्ता नवोपक्रम आणि आंतरकार्यक्षमतेसाठी (Interoperability) स्थानिक डेटासेट्स आणि प्लॅटफॉर्म्स निर्मिती

उच्च-गुणवत्तेचे, प्रतिनिधित्व करणारे आणि सुशासित (well-governed) डेटासेट्स उपलब्ध असणे हे प्रभावी कृत्रिम बुद्धिमत्ता उपाययोजनांच्या विकास व अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक आहे. प्रशिक्षण (training), प्रमाणीकरण (validation) आणि सातत्यपूर्ण सुधारणा यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली मोठ्या प्रमाणावर संरचित (structured) व असंरचित (unstructured) डेटावर अवलंबून असतात. महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणामध्ये नवोन्मेषाला (innovation) चालना देण्यासाठी सक्षम डेटा पायाभूत संरचना आणि आंतरकार्यक्षम (interoperable) प्लॅटफॉर्म विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

७.१ क्षेत्र-विशिष्ट (Domain-specific) डेटासेट्सची निर्मिती आणि संकलन

महाराष्ट्र शासन कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विकास आणि अंमलबजावणीला पाठबळ देण्यासाठी प्राधान्य क्षेत्रांमध्ये उच्च-गुणवत्तेचे डेटासेट्स तयार करण्यासाठी आणि संकलित करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देईल.

- शासन प्राधान्य क्षेत्रांमध्ये उच्च-दर्जाचे आणि विश्वासार्ह (trusted) डेटासेट्स तयार करण्यासाठी, संकलित करण्यासाठी आणि त्यांचे शाश्वत व्यवस्थापन (sustained management) करण्यासाठी सुविधा पुरवेल. तसेच, शासकीय विभाग, स्टार्टअप्स, संशोधक आणि परिसंस्थेतील भागीदारांसाठी डेटाची उपलब्धता, आंतरकार्यक्षमता आणि जबाबदारीपूर्वक उपलब्धता (responsible access) सुधारण्यावर राज्य शासन लक्ष केंद्रित करेल.
- कृषी, आरोग्य सेवा, शिक्षण, नागरी प्रशासन (urban governance), वाहतूक, पर्यावरण, कौशल्य विकास आणि सार्वजनिक सेवा वितरण यांसारख्या क्षेत्रांमधील विषय-विशिष्ट डेटासेट्सना प्राधान्य दिले जाईल. प्रशासकीय विभागांना त्यांच्या ताब्यातील (under their custody) उच्च-मूल्य (high-value) असलेले डेटासेट्स ओळखण्यासाठी आणि ते 'AI-सज्ज' (AI-ready) करण्यासाठी डेटा शुद्धीकरण (data cleaning) व मानकीकरणासाठी (standardisation) सुव्यवस्थित प्रयत्न करण्यास प्रोत्साहित केले जाईल.
- सर्वसमावेशक व नागरिकाभिमुख कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) उपयोजनांना सक्षम करण्यासाठी स्थानिक भाषा व संदर्भाधारित डेटासेट्सची निर्मिती हा एक महत्त्वाचा प्राधान्यक्रम राहील. मराठी भाषा विभाग तसेच इतर संबंधित संस्था मराठी भाषेतील डेटासेट्स विकसित करण्यासाठी सहकार्य करतील. हे डेटासेट्स स्थानिक संदर्भांसह आदिवासी बोलीभाषांनाही अनुरूप अशा व्हॉइस-आधारित इंटरफेसेस, संवादात्मक AI, स्वयंचलित तक्रार निवारण आणि डिजिटल सार्वजनिक सेवा यांसारख्या उपयोजनांना सक्षम करतील.
- संवेदनशील क्षेत्रांसाठी सुरक्षित डेटा-शेअरिंग (data-sharing) आराखडे तयार केले जाईल.

- गोपनीयता (privacy), डेटा सुरक्षा (data security) आणि डेटा सार्वभौमत्व (data sovereignty) हे डेटासेट्सच्या निर्मिती आणि संकलनाचे अविभाज्य भाग असतील.

७.२ राज्य कृत्रिम बुद्धिमत्ता डेटा आदान-प्रदान आणि डेटासेट प्लॅटफॉर्म्स

- जबाबदारीपूर्ण डेटा-सामायीकरण सुलभ करण्यासाठी राज्य शासन एक 'स्टेट AI डेटा एक्सचेंज' (State AI Data Exchange) स्थापन करेल. हे डेटा एक्सचेंज अनुपालन (compliance), गोपनीयता आणि सुरक्षा सुनिश्चित करतानाच, AI मॉडेल्सचे प्रशिक्षण, चाचणी (testing) आणि प्रमाणीकरणाला (validation) पाठबळ देण्यासाठी एक मूलभूत स्तर (foundational layer) म्हणून काम करेल.
- डेटाच्या प्रभावी वापरासाठी राज्य शासन 'AI डेटासेट्स प्लॅटफॉर्म'चा वापर करेल, जे राज्याद्वारे विकसित केले जाऊ शकते किंवा केंद्र शासनाच्या विद्यमान 'AI कोष' (AI Kosh) या प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध करून घेतले जाऊ शकते.
- विविध क्षेत्रांमधील AI नवोन्मेषाला चालना देऊ शकणाऱ्या 'ओपन-सोर्स' (open-source) आणि सामायिक (shared) डेटासेट्सच्या निर्मिती आणि योगदानामध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागाला राज्य शासन सक्रियपणे प्रोत्साहित करेल.

८. कुशल व भविष्योन्मुख मनुष्यबळासाठी स्थानिक कौशल्य विकास व प्रशिक्षण

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींच्या रचना, अंमलबजावणी आणि प्रशासनासाठी कुशल व भविष्योन्मुख मनुष्यबळ अत्यावश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब गतीमान होत असताना, सार्वजनिक क्षेत्र व उद्योगांच्या बदलत्या गरजा पूर्ण करू शकणारे स्थानिक, उपयोजनाभिमुख कौशल्य असलेले मनुष्यबळ महाराष्ट्रासाठी आवश्यक आहे. त्यानुसार, राज्याच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणामध्ये प्राधान्य क्षेत्रांशी सुसंगत शाश्वत कौशल्य पुरवठा साखळी निर्माण करण्यासाठी संरचित व परिणामाभिमुख प्रशिक्षण यंत्रणांवर भर देण्यात येईल, ज्यास औपचारिक शिक्षण व सर्वसमावेशक साक्षरता उपक्रमांचा आधार असेल.

राज्य शासन विविध प्रशासकीय विभाग, प्रशिक्षण संस्था, शैक्षणिक संस्था आणि उद्योग भागीदार यांच्या समन्वित सहभागाद्वारे प्रशिक्षण कार्यक्रमांची सुसंगतता, व्यापकता आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करेल.

८.१ व्यावसायिक प्रशिक्षण व मनुष्यबळ कौशल्य वृद्धी

- राज्य शासन “महाराष्ट्र प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण केंद्र” (Maharashtra Centre for Advanced AI Training - MCAT) स्थापन करून कृत्रिम बुद्धिमत्ता-सज्ज मनुष्यबळ विकास बळकट करेल. हे

केंद्र उद्योग-सुसंगत, अल्पकालीन आणि उपयोजनाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम प्रदान करणारी स्वतंत्र संस्थात्मक यंत्रणा म्हणून कार्य करेल.

- महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण केंद्र (MCAT) हे विद्यार्थी, कार्यरत व्यावसायिक, उद्योजक तसेच प्रारंभिक स्तरावरील व्यावसायिक यांना विद्यमान व उदयोन्मुख औद्योगिक मागणीशी सुसंगत व्यावहारिक कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्यांनी सुसज्ज करण्यावर भर देईल. प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता विकास व उपयोजनास सहाय्यभूत ठरणाऱ्या लक्षित मनुष्यबळाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने, या केंद्रामार्फत मॉडेल मूल्यांकन, डेटा निर्मिती तसेच संबंधित विशेष कौशल्य संच अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात येईल.

- MCAT दोन परस्परपूरक घटकांद्वारे कार्य करेल:

    - उद्योग भागीदारी घटक: राज्य शासन किमान १० जागतिक व देशांतर्गत तंत्रज्ञान संस्थांसोबत सहकार्य करून ३ ते ६ महिन्यांच्या कालावधीचे अल्पकालीन कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करेल व राबवेल. हे कार्यक्रम विविध क्षेत्रांतील मनुष्यबळाच्या गरजांशी सुसंगत असतील आणि प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता साधने, प्लॅटफॉर्म आणि वापर प्रकरणांचा (use cases) अनुभव देऊन उद्योग-सज्ज मनुष्यबळ निर्माण करतील.

    - शैक्षणिक भागीदारी घटक: MCAT किमान १० नामांकित शैक्षणिक संस्थांसोबत सहकार्य करून कृषी, आरोग्य, उत्पादन, वित्त, प्रशासन आणि भाषा तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांसाठी विषयाधारित प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करेल. हे कार्यक्रम उपयोजनाधारित शिक्षण, क्षेत्रनिहाय संदर्भ आणि समस्या-निराकरण कौशल्यांवर आधारित असतील.

- राज्य शासनाकडून MCAT संदर्भातील योजना तयार करण्यात येईल, ज्याअंतर्गत सहभागींची निवड पारदर्शक व गुणवत्ताआधारित प्रक्रियेनुसार करण्यात येईल. उच्च दर्जाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) प्रशिक्षणापर्यंत समतोल प्रवेश सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, विशेषतः विद्यार्थी तसेच कारकिर्दीच्या प्रारंभिक टप्प्यातील व्यावसायिकांसाठी, निवडलेल्या सहभागींकडून भरलेल्या अभ्यासक्रम शुल्काचा अंशत: परतावा देण्यात येईल.

- संरचित प्रशिक्षण कार्यक्रमांव्यतिरिक्त, MCAT उद्योजक, MSME आणि कार्यरत व्यावसायिकांसाठी त्यांच्या विशिष्ट कौशल्य गरजांनुसार/मागणीनुसार प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देईल. अशा कार्यक्रमांसाठीचा खर्च संबंधित लाभार्थ्यांकडून आकारण्यात येईल.

- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत शैक्षणिक संस्था, पॉलिटेक्निक तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITIs) येथील शिक्षक / प्रशिक्षक यांच्या कौशल्यवृद्धीसाठी (upskilling) उपयुक्त प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात येईल.

८.२ शासकीय अधिकाऱ्यांसाठी क्षमता बांधणी (Capacity Building)

- कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब, अंमलबजावणी आणि प्रशासनासाठी संस्थात्मक तयारी वाढविण्यासाठी राज्य शासन शासकीय अधिकाऱ्यांसाठी विशेष क्षमता बांधणी उपक्रम राबवेल. अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेऊन, विविध जबाबदाऱ्या व कार्यात्मक भूमिकांनुसार सुसंगत संरचित प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करण्यात येईल.

- कृत्रिम बुद्धिमत्ता संकल्पना, वापर प्रकरणे (use cases), खरेदी प्रक्रिया, प्रशासन आणि देखरेख यांसंदर्भातील विशेष प्रशिक्षण कार्यक्रम 'यशदा' (YASHADA) यांच्या सहकार्याने तसेच राज्य-समर्थित उत्कृष्टता केंद्रे (CoEs) व इतर भागीदारांच्या सहयोगाने राबविण्यात येतील.

- शक्य तेथे, MCAT किंवा उत्कृष्टता केंद्रांद्वारे विकसित करण्यात आलेले प्रशिक्षण साहित्य iGOT सारख्या राष्ट्रीय डिजिटल शिक्षण व्यासपीठांवर उपलब्ध करून देण्यात येईल, ज्यायोगे विविध संस्था व विभागांमध्ये त्याचा व्यापक वापर आणि पुनर्वापर सुलभ होईल.

९. सार्वजनिक क्षेत्रातील नवोपक्रमांसाठी स्टार्टअप-फर्स्टचा अवलंब व अर्थसहाय्य

महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरणात प्रशासन व उद्योग क्षेत्रांमध्ये अनुप्रयुक्त AI चा अंगीकार वाढविण्यासाठी स्टार्टअप्स व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSMEs), महत्त्वपूर्ण सक्षम घटक म्हणून ओळखण्यात येत आहे. AI अंगीकाराची गती वाढविणे व प्रवेशातील अडथळे कमी करणे या उद्देशाने, राज्य शासन "स्टार्टअप-प्रथम" दृष्टिकोन अवलंबेल, ज्यामध्ये सामायिक AI व्यासपीठे, लक्षित आर्थिक प्रोत्साहने तसेच संरचित संस्थात्मक सहाय्य यांचा समावेश असेल. या स्तंभांतर्गत स्टार्टअप्स व MSMEs यांना AI साधनांचा वापर, AI उपाययोजनांचा अंगीकार तसेच राज्याच्या प्राधान्यक्रमांशी सुसंगत नवोन्मेषांचे विस्तार करण्यासाठी सक्षम करण्यात येईल.

९.१ MSME साठी कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब सहाय्य

- राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये (MSMEs) उत्पादकता व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) व्यापक अंगीकार प्रोत्साहित करण्यात येईल. यासाठी परिणामाभिमुख व व्यावहारिक AI अंमलबजावणी सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून लक्षित आर्थिक व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

  MSMEs साठी AI अंमलबजावणी खर्चावर २०% अनुदान, प्रति MSME कमाल रु. ५ लाख मर्यादेपर्यंत, दरवर्षी जास्तीत जास्त १००० MSMEs साठी "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वावर प्रदान करण्यात येईल.
- सदर अनुदान केवळ पात्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापर प्रकरणांपुरते (use cases) लागू राहील. अनुदान मंजुरीसाठी तांत्रिक मूल्यमापन व शिफारसी प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमार्फत (जसे की IIT मुंबई) करण्यात येतील, ज्यायोगे प्रक्रियेत काटेकोरपणा, सुसंगतता व सर्वोत्तम पद्धतींशी सुसंगती सुनिश्चित करण्यात येईल.
- थेट आर्थिक सहाय्याव्यतिरिक्त, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये (MSMEs) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) अंगीकाराचा खर्च व गुंतागुंत कमी करण्याच्या उद्देशाने, राज्य शासनाकडून "महा AI टूल्स हब" हे केंद्रीकृत सामायिक-सेवा व्यासपीठ स्थापन करण्यात येईल. या व्यासपीठावर उत्पादन, सेवा, लॉजिस्टिक्स, किरकोळ व्यापार तसेच संबंधित क्षेत्रांतील MSMEs च्या सामान्य वापर प्रकरणांसाठी (use cases) उपयुक्त अशा खाजगी क्षेत्रातील संस्थांनी विकसित केलेल्या निवडक AI साधने, उपाययोजना व व्यासपीठांचा समावेश करण्यात येईल.
- सदर "महा AI टूल्स हब" हे सामायिक प्रवेश पद्धतीवर कार्य करील, ज्यायोगे MSMEs ना पायाभूत सुविधा किंवा परवान्यांवरील मोठ्या प्रारंभिक गुंतवणुकीशिवाय AI साधनांचा वापर करता येईल. या

व्यासपीठावर उपलब्ध साधनांची निवड, प्रमाणीकरण व नियतकालिक पुनरावलोकन, राज्यातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमार्फत करण्यात येईल, ज्यायोगे MSMEs साठी त्यांची तांत्रिक विश्वासार्हता, उपयुक्तता व मूल्य सुनिश्चित करण्यात येईल.

- राज्य शासनाकडून विविध क्षेत्रांतील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (MSMEs) सुलभ व सक्षम करणाऱ्या चौकटीद्वारे समान कृत्रिम बुद्धिमत्ता उपाययोजनांच्या विकासास व अंगीकारास प्रोत्साहन देण्यात येईल. यामध्ये एकात्मिक "AI-as-a-Service" व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची तरतूद समाविष्ट असेल.

९.२ स्टार्टअप अर्थसहाय्य आणि नवोपक्रम सहाय्य

- AI-संचलित स्टार्टअप्सच्या निर्मितीला आणि विस्तारीकरणाला (scaling) पाठबळ देण्यासाठी, राज्य शासन ₹५०० कोटींच्या निधीसह (corpus) एक समर्पित 'AI स्टार्टअप व्हेंचर फंड' (AI Startup Venture Fund) स्थापन करेल. हा निधी सार्वजनिक आणि खाजगी सहभागावर (blended public-private vehicle) आधारित असेल, ज्यामध्ये महाराष्ट्र शासनाकडून ₹२५० कोटींचे योगदान दिले जाईल आणि खाजगी भांडवलाला चालना देण्यासाठी व जोखीम विभागण्यासाठी (sharing risk) उद्योग क्षेत्रातील भागीदारांकडून ₹२५० कोटी उभे केले जातील.
- या व्हेंचर फंडाचे व्यवस्थापन उद्योग क्षेत्रातील सर्वोत्तम पद्धतींनुसार (industry best practices) व्यावसायिकरीत्या केले जाईल. गुंतवणुकीचे निर्णय व्यावसायिक व्यवहार्यता (commercial viability), तांत्रिक नवोपक्रम आणि राज्याच्या प्राधान्य क्षेत्रांशी असलेली सुसंगतता यांच्या आधारे घेतले जातील. स्टार्टअप्सची निवड करण्यासाठी आणि धोरणात्मक संनियंत्रण (strategic oversight) करण्यासाठी एक 'कृती गट' (Working Group) स्थापन केला जाईल; ज्यामध्ये पाच प्रमुख उद्योगपती आणि शासनाचे तीन प्रतिनिधी - सचिव (माहिती तंत्रज्ञान), अपर मुख्य सचिव (वित्त) आणि अपर मुख्य सचिव (कौशल्य विकास) यांचा समावेश असेल.

१०. प्रायोगिक तत्त्वापासून व्यापक प्रमाणावरील अंमलबजावणीपर्यंत (Pilot-to-Scale Deployment) अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगकाची अंमलबजावणी

विविध क्षेत्रांमध्ये अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रायोगिक प्रकल्प (pilots) राबविले जात आहेत, परंतु अनेक उपाययोजना (solutions) संकल्पना-पुरावा (proof-of-concept) टप्प्यापलीकडे प्रगती करू शकत नाहीत. प्रमाणीकरणासाठी (validation) सुव्यवस्थित पाठबळाचा अभाव हे यामागचे मुख्य कारण आहे. ही तफावत दूर करण्यासाठी, महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणात AI उपाययोजनांचे प्रायोगिक तत्त्वावरून उत्पादन स्तरावरील अंमलबजावणीत (production-scale deployment) रूपांतर करण्यासाठी राज्यव्यापी यंत्रणा म्हणून ' अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता ॲक्सिलरेटर' (Applied AI Accelerator) स्थापन करण्यात येईल.

अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रवेगक राज्याच्या प्राधान्यक्रमांशी सुसंगत उपयोजनांवर लक्ष केंद्रित करेल आणि स्टार्टअप्सना संस्थात्मक सहाय्य, प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी वातावरण तसेच संरचित विस्तार मार्ग उपलब्ध करून देईल.

१०.१ कृत्रिम बुद्धिमत्ता इनक्युबेशन (Incubation) आणि प्रवेगक (Acceleration) पायाभूत सुविधा

- राज्य शासन AI स्टार्टअप्सना सुव्यवस्थित मार्गदर्शन (structured mentorship), तांत्रिक पायाभूत सुविधा आणि सुरुवातीच्या टप्प्यातील पाठबळ (early-stage support) प्रदान करण्यासाठी AI-केंद्रित इनक्युबेटर्स आणि ॲक्सिलरेटर्सची स्थापना करून AI स्टार्टअप परिसंस्था (ecosystem) बळकट करेल. हे इनक्युबेटर्स नवोपक्रमांचे (innovation) संवर्धन करण्यासाठी संस्थात्मक आधारस्तंभ म्हणून काम करतील, ज्यामुळे स्टार्टअप्सना संकल्पनेपासून (ideation) बाजारपेठेसाठी तयार असलेल्या उपाययोजनांपर्यंत (market-ready solutions) प्रगती करणे शक्य होईल.
- संतुलित प्रादेशिक विकास सुनिश्चित करण्यासाठी आणि प्रमुख शहरी केंद्रांच्या पलीकडे नवोपक्रम पायाभूत सुविधांची उपलब्धता वाढवण्यासाठी, महाराष्ट्रात प्रत्येक प्रशासकीय विभागात दोन याप्रमाणे एकूण १२ कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) इनक्युबेटर्स स्थापन केले जातील. हे इनक्युबेटर्स शासकीय व्यवस्थापनाखालील तांत्रिक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये (government-managed technical and academic institutions) स्थापन केले जातील, जेथे विद्यमान प्राध्यापकांचे कौशल्य, संशोधन क्षमता, विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता आणि प्रयोगशाळांच्या पायाभूत सुविधांचा पुरेपूर वापर केला जाईल.
- राज्य शासन महाराष्ट्राच्या आर्थिक व प्रशासकीय गरजांशी सुसंगत प्राधान्य कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी इन्क्युबेटर्सना प्रोत्साहन देईल तसेच स्टार्टअप्स, शैक्षणिक संस्था आणि शासकीय विभाग यांच्यातील सहकार्य सुलभ करेल.

१०.२ स्टार्टअप पायलट, अनुदान आणि सर्वसमावेशक सहाय्य यंत्रणा

- सार्वजनिक सेवा वितरण व प्रशासनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) उपाययोजनांची अंमलबजावणी वेगाने करण्याच्या उद्देशाने, राज्य शासनाकडून निवडक AI स्टार्टअप्सना शासकीय विभागांमध्ये पायलट प्रकल्प राबविण्यासाठी व उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी लक्षित आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल. या उपक्रमांतर्गत, कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत आयोजित राज्य स्टार्टअप महोत्सव किंवा तत्सम कार्यक्रमांद्वारे निवडलेल्या स्टार्टअप्सना इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (E, IT & AI) विभागाकडून प्रति स्टार्टअप कमाल रु. १ कोटींपर्यंत (महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप्ससाठी कमाल रु. १.२५ कोटींपर्यंत) अनुदान देण्यात येईल.

११. अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता नवोन्मेष संशोधनासाठी उत्कृष्टता केंद्रे

११.१. क्षेत्र-विशिष्ट उत्कृष्टता केंद्रांची स्थापना

- राज्य शासन अनुप्रयुक्त संशोधन, नवोन्मेष आणि क्षेत्रनिहाय कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंबासाठी संस्थात्मक आधार म्हणून सहा क्षेत्र-विशिष्ट किंवा विषयाधारित उत्कृष्टता केंद्रे (CoE) स्थापन करेल. ही केंद्रे नगर विकास, संस्कृती व मराठी भाषा, भू-स्थानिक तंत्रज्ञान, कृषी, वित्त/महसूल, शिक्षण आणि आरोग्य सेवा या क्षेत्रांमध्ये संबंधित प्रशासकीय विभाग, शैक्षणिक संस्था आणि परिसंस्थेतील भागीदारांच्या सहकार्याने स्थापन करण्यात येतील.

- प्रत्येक उत्कृष्टता केंद्र हे विषयतज्ज्ञ, डेटा वैज्ञानिक, संशोधक आणि उद्योग भागीदार यांना एकत्र आणणारे, बहुविद्याशाखीय कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नवोन्मेष केंद्र म्हणून कार्य करेल. आवश्यकतेनुसार क्षेत्रनिहाय मानके विकसित करण्यासाठी उद्योग भागीदारांचे सहकार्य घेतले जाईल.

- उत्कृष्टता केंद्रे प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित उत्पादने व उपाययोजना विकसित करणे, शासन व उद्योग घटकांसाठी क्षमता वृद्धी करणे तसेच पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रिया व प्रशासनाला सहाय्य करणारे धोरणाभिमुख संशोधन यावर लक्ष केंद्रित करतील.

- संशोधनाचे उपयोजनक्षम उपायांमध्ये रूपांतर करणे, शासकीय विभागांसोबत पायलट प्रकल्पांना सहाय्य करणे, डेटासेट निर्मिती व मॉडेल विकासास हातभार लावणे तसेच शैक्षणिक संस्था, उद्योग व सार्वजनिक क्षेत्र यांच्यातील सहकार्य बळकट करणे यामध्ये उत्कृष्टता केंद्रांची महत्त्वपूर्ण भूमिका असेल.

११.२ संशोधन व विकास (R&D) सहाय्य आणि बौद्धिक संपदा निर्मिती

- स्वदेशी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन, नवोन्मेष आणि बौद्धिक संपदा निर्मितीला चालना देण्यासाठी राज्य शासन पात्र प्रकल्पांना बौध्दिक संपदा निर्माण करण्यासाठी सहाय्य प्रदान करेल. हे सहाय्य स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग भागीदारांद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी लागू असेल.

- या सहाय्यांतर्गत पेटंट अर्ज खर्च परतावा देण्यात येईल (धोरणाच्या भाग १३ नुसार)

१२. नैतिक कृत्रिम बुद्धिमत्ता (Ethical AI) आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी अनुपालन आराखडा

शासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत असल्यामुळे, त्याचा उपयोग नैतिक, पारदर्शक, सुरक्षित आणि उत्तरदायी पद्धतीने होणे सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणामध्ये सार्वजनिक हित, नागरिकांचे हक्क आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम प्रणालींवरील विश्वास अबाधित ठेऊन नवोन्मेषाला चालना देणारा उत्तरदायी कृत्रिम बुद्धिमत्ता आराखडा स्वीकारण्यात आला आहे.

या स्तंभांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संपूर्ण जीवनचक्रात उत्तरदायी तत्त्वांचा समावेश करणे, नैतिक कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंबासाठी संस्थात्मक क्षमता बळकट करणे तसेच धोरणाच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे यावर भर देण्यात येईल.

महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींच्या जबाबदारीपूर्वक अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहन देणे हा या धोरणाचा उद्देश असून, त्यामध्ये आवश्यकतेनुसार नोंदणी, पारदर्शकता व स्पष्टीकरण क्षमतेशी संबंधित उपायांचा समावेश राहील. विशेषतः शासन किंवा सार्वजनिक क्षेत्रातील वापर प्रकरणांसाठी अंमलबजावणी पूर्वी चाचणी व प्रमाणीकरण प्रक्रियांना प्रोत्साहन देण्यात येईल.

राज्यातील सर्व प्रशासकीय विभागांमध्ये दरवर्षी कृत्रिम बुद्धिमत्ता सज्जता लेखापरीक्षण करण्यात येईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता सुरक्षा व प्रशासनासंदर्भातील मार्गदर्शन, समुपदेशन आणि सर्वोत्तम पद्धतींसाठी अग्रगण्य शैक्षणिक व संशोधन संस्थांमधील विद्यमान प्रयोगशाळा आणि उत्कृष्टता केंद्रांचा संदर्भ म्हणून उपयोग करण्यात येईल.

१३. कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब आणि नवोपक्रमांना चालना देण्यासाठी प्रोत्साहने (Incentives)

- **स्थिर भांडवली गुंतवणूक (Fixed Capital Investment - FCI) प्रोत्साहन (भांडवली अनुदान):** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिट्सना, खालील तक्त्यानुसार, नवीन तसेच विस्तार करणाऱ्या युनिट्ससाठी भांडवली गुंतवणुकीवर कमाल २०% पर्यंत भांडवली अनुदान देण्यास पात्रता राहील. सदर अनुदान "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वावर मंजूर करण्यात येईल व ५ वर्षांच्या धोरण कालावधीत एकूण रु.२,००० कोटी इतक्या मर्यादेपर्यंत लागू राहील.
    - भांडवली अनुदान वितरणासाठी पुढीलप्रमाणे स्तरनिहाय (slab-wise) मर्यादा लागू राहतील:

गुंतवणुकीचा आकार	कमाल अनुदान (%)	कमाल अनुदान मर्यादा
रु. १० कोटीपर्यंत (समाविष्ट)	२०%	कमाल रु. १.५० कोटीपर्यंत
रु. १० कोटीपेक्षा अधिक व रु. १०० कोटीपर्यंत	१५%	कमाल रु. ५ कोटीपर्यंत
रु. १०० कोटीपेक्षा अधिक व रु. ५०० कोटीपर्यंत	१०%	कमाल रु. २५ कोटीपर्यंत
रु. ५०० कोटीपेक्षा अधिक	५%	कमाल रु. ५० कोटीपर्यंत

- **अतिरिक्त स्थिर भांडवली गुंतवणूक (FCI) प्रोत्साहन (भांडवली अनुदान):** राज्यातील नामनिर्दिष्ट AI नवोन्मेषन क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिट्सची स्थापना करणाऱ्या (नवीन तसेच विस्तार करणाऱ्या) युनिट्सना अतिरिक्त १०% भांडवली अनुदान (कमाल अनुदानाच्या १०% मर्यादे पर्यंत) देण्यास पात्रता राहील. सदर अनुदान हे वरील तक्त्यात नमूद केलेल्या भांडवली अनुदानाव्यतिरिक्त राहील व ५ वर्षांच्या धोरण कालावधीत यासाठी एकूण रु. २०० कोटी इतकी मर्यादा राहील.

- **MSME साठी कृत्रिम बुद्धिमत्ता अवलंब सहाय्य:** MSMEs साठी AI अंमलबजावणी खर्चावर २०% अनुदान, प्रति MSME कमाल रु. ५ लाख मर्यादेपर्यंत, दरवर्षी जास्तीत जास्त १००० MSMEs साठी "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वावर प्रदान करण्यात येईल.

- **मुद्रांक शुल्क सवलत (Stamp Duty Exemptions):** राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिट्सना धोरण कालावधीत मुद्रांक शुल्कामध्ये १००% सूट देण्यात येईल.

- **वीज शुल्क सवलत (Power Duty Exemption):** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिट्सना प्रकल्पाच्या कालावधीसाठी, कमाल १० वर्षांपर्यंत, वीज **शुल्क सवलत** देण्यास पात्रता राहील. सदर **सवलत** केवळ

पात्र AI-संबंधित कार्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या वीज वापरापुरते मर्यादित राहील. निवासी वापर अथवा AI कार्यांशी असंबंधित उपक्रमांसाठी वापरल्या जाणाऱ्या वीजेवर ही **सवलत** लागू राहणार नाही.

- **वीज दर अनुदान (Tariff Subsidy):** राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिट्सना १० वर्षांच्या कालावधीसाठी प्रति युनिट रु. २ इतके वीज अनुदान देण्यात येईल. संज्ञांसाठी परिशिष्ट १४.२ चा संदर्भ घ्यावा.

- **प्रदर्शन भाडे परतावा (Exhibition Rentals):** महाराष्ट्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) युनिट्सना राष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभागासाठी प्रदर्शन भाडे परतावा कमाल रु. १० लाखांपर्यंत तसेच आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभागासाठी कमाल रु. २५ लाखांपर्यंत अनुज्ञेय राहील. तथापि, सदर परतावा केवळ पूर्वमान्यता प्राप्त सहभागासाठीच मंजूर करण्यात येईल.

- **पेटंट अर्ज खर्च परतावा (Patent Filing Cost):** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)-आधारित पेटंट्ससाठी प्रत्यक्ष पेटंट अर्ज व कायदेशीर खर्चाचा परतावा, देशांतर्गत पेटंट्ससाठी प्रति युनिट कमाल रु. ८ लाख व आंतरराष्ट्रीय पेटंट्ससाठी प्रति युनिट कमाल रु. १० लाख या मर्यादेपर्यंत देण्यास पात्रता राहील. सदर अनुदान **पेटंट** प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल.

- **प्रमाणन खर्च परतावा (Certification Cost Reimbursement):** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) संबंधित गुणवत्ता प्रमाणनांसाठी झालेल्या खर्चाचा १००% परतावा, प्रति AI युनिट कमाल रु. २५ लाख या मर्यादेपर्यंत देण्यास पात्रता राहील.

  परताव्यास पात्र असलेल्या प्रमाणनांच्या यादीसाठी परिशिष्ट १४.१ चा संदर्भ घ्यावा.

  * या धोरणांतर्गत प्रोत्साहनांच्या वितरणासाठी प्रोत्साहनांच्या वितरणाचे स्वरूप आणि कार्यपद्धती स्पष्ट करणारा सविस्तर शासन निर्णय (GR) जारी करण्यात येईल.

१४. परिशिष्ट

१४.१ परताव्यास पात्र प्रमाणनांची यादी

क्र.	प्रमाणन	मानक
१	IS/ISO/IEC २०५४६:२०१९	Information Technology – Big Data – Overview and Vocabulary
२	IS/ISO/IEC/TR २०५४७-१:२०२०	Information Technology – Big Data Reference Architecture – Part १: Framework and Application Process
३	IS/ISO/IEC २०५४७-३:२०२०	Information Technology – Big Data Reference Architecture – Part ३: Reference Architecture
४	IS/ISO/IEC २२९८९:२०२२	Information Technology – Artificial Intelligence – Artificial Intelligence Concepts and Terminology
५	IS/ISO/IEC २३०५३:२०२२	Framework for Artificial Intelligence (AI) Systems Using Machine Learning (ML)
